71/2020

2019

प्रा. पवार


# VIDYAWARTA®

Peer Reviewed International Refereed Research Journal

Special Issue- February- 2020
(Vol- 05


Sahakar Maharshi Late Bhaskaarrao Shingne
Smruti Arogya and Shikshan Prasarak Mandal's

# SAHAKAR MAHARSHI LATE BHASKARRAO SHINGE ARTS COLLEGE,

KHAMGAON, DIST.BULDHANA (M.S.)

(Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati.)



• Organizes •

One Day Inter Disciplinary National Conference on

# HUMANITIES, CULTURE AND SOCIETY

Scanned by TapScanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Special Issue-05, February 2020

Sahakar Maharshi Late Bhaskarrao Shingne
Smruti Arogya And Shikshan Prasarak Mandal's

**Sahakar Maharshi Late Bhaskarrao Shingne Arts College,**
Khamgaon, Dist.Buldhana

**Organizes**
One Day Interdisciplinary National Conference On

## Humanities, Culture And Society

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**

Reg No U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At Post Limbaganesh Tq.Dist Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned by TapScanner

52) विदर्भातील धार्मिक स्थिती
कु.प्रियंका किसन अढाव ||177

53) १९ व्या शतकातील सामाजिक धार्मिक चळवळी
रिता सुरतसिंग राजपूत ||180

54) महात्मा ज्योतिबा फुलेंच्या सामाजिक कार्यातील मानवतावादी दृष्टीकोन
प्रा.कु. वंदना अर्जुन जिवने, भंडारा ||183

55) नविन आर्थिक धोरण- भारतीय अर्थव्यवस्थे समोरील आव्हान
डॉ. अलका अनिल मानकर, बुलढाणा ||186

56) मानवी जीवनामध्ये मराठी संस्कृती आणि लोकसंगीताचे महत्व
प्रा. वंदना म देशमुख, डॉ. शिरीष कडू, अकोला ||190

57) मानव जीवनात संगीताची सर्वांगिण सकारात्मक भूमिका
डॉ. गिताली एस. पांडे, अकोला ||193

58) संत साहित्य मराठी
प्रा. कु. भावना मनोज तायडे, यवतमाळ ||195

59) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे ग्रामासंबधी विचार
प्रा.डॉ. हर्षा पं. येवले, बुलडाणा ||199

60) संत साहित्य : आकलन आणि आस्वाद
प्रा. संध्या जंजाळ, यवतमाळ ||202

61) एकत्र कुटुंबव्यवस्थेतील स्त्रीजीवन दर्शन (मराठी कादंबरीच्या आधारे)
प्रा. डॉ. सविता माधवराव पवार, मेहकर ||205

62) संगीत का मानव जीवन में स्थान
मिनाक्षी बसवंत, पुणे ||208

63) स्वामी विवेकानंद के साहित्य में युवाओं के लिए विचार
सै. रमिझ सै. वसिम, वाशिम ||211

64) मानव अधिकार तथा आज की वास्तविकता
डॉ. राधा सवजीयाणी, अकोला ||213



http://www.printingarea.blogspot.com/03 www.vidyawarta.com

Scanned by TapScanner

संतांचे कार्य मुख्यत: धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रातील होते. व्यापक सामाजिक परिवर्तनाचे त्यांचे उद्दिष्ट नव्हते. या मर्यादित क्षेत्रात मात्र संतांनी समता आणि मानवता ही मूल्ये रूजवली. व्यक्तीच्या चारित्र्यशुध्दीचा आग्रह धरला. परमार्थीक पातळीवर त्यांनी सर्वसमभाव रूजवला. समाजजीवनातील कर्मकांडाचे व पुरोहितवर्गाचे वर्चस्व कमी केले आणि भक्तीचे सर्वजन-सुलभ आणि शुध्द स्वरूप प्रसारित केले.

संतांनी लोकभाषेचा वापर केला. लोकसंस्कृतीतील प्रसार माध्यमांचा वापर केला आणि लोकांपर्यंत ज्ञानगंगा प्रवाहित केली. देशी भाषांचे सामर्थ्य व सौंदर्य संतांनी संतसाहित्यातून सिध्द केले.

**संदर्भसूची -**

१. मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १ - डॉ. शं. गो. तुळपुळे
२. महाराष्ट्र सारस्वत - भावे वि. ल.
३. संत साहित्य दर्शन - डॉ. उषा देशमुख
४. मध्ययुगीन वाङ्मय प्रवाह - य. च. महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक
५. ज्ञानेश्वरांची जीवनप्रतिष्ठा - प्रा. गं. बा. सरदार
६. मराठी साहित्य सम्मेलन : अध्यक्षीय भाषणे - डॉ. शं. दा. पेंडसे
७. संत साहित्य हा मराठी साहित्याचा पाया - चकोर बाविस्कर, लोकसत्ता २३ फेब्रु. २०१३
८. संत साहित्य : संदर्भ कोश

□□□

**61**

# एकत्र कुटुंबव्यवस्थेतील स्त्रीजीवन दर्शन

**(मराठी कादंबरीच्या आधारे)**

**प्रा. डॉ. सविता माधवराव पवार**
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर

**प्रस्तावना :**

आजच्या आधुनिक महाराष्ट्रीय स्त्रीच्या विकासाची सुरूवात एकोणिसाव्या शतकात झाली. त्याकाळी एकत्र कुटुंबातून वावरणारी स्त्री अन्याय, अत्याचाराखाली होरपळून निघाली होती. बालविवाह, वैधव्य बालाजरठविवाह, केशवपण, शिक्षणाचा अभाव, अकाली मातृत्व इत्यादी नाना प्रश्न तिच्या जीवनात होते. न्या. रानडे, गोपाळ गणेश आगरकर, म. फुले, सावित्रीबाई फुले, महर्षि कर्वे यांसारख्या समाजसुधारकांच्या पुढाकाराने स्त्रियांच्या स्थितीमध्ये सुधारणा झाली. इ. स. १८५७ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'यमुना पर्यटन' या बाबा पद्मनजींच्या कादंबरीद्वारे हिंदू विधवा स्त्रियांच्या दु: स्थितीवर प्रकाश पडतो. 'पण लक्षात कोण घेतो!' मधून हरिभाऊ आपटे यांनी यमू आणि तिच्या परिवारातील इतर स्त्रियांच्या द्वारे एकत्र कुटुंबातील स्त्रियांच्या परिस्थितीचे आकलन होते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये एकत्र कुटुंबव्यवस्थेमध्ये स्त्रियांचे जीवन कसे होते, त्याचा विचार मराठी कादंबरीच्या आधारे केला आहे.

**हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्या :**

हरिभाऊ आपटे यांच्या 'पण लक्षात कोण घेतो!' सारख्या कुटुंबकथेतून पांढरपेशा मराठी समाजाच्या जीवनाचे विविध अंगानी दर्शन घडते. त्यांच्या 'मायेचा बाजार', 'यशवंतराव खरे' इत्यादी कादंबऱ्यांतून एकत्र कुटुंब पद्धतीचे दर्शन घडते. सामाजिक कादंबऱ्यांद्वारे समाजाचे प्रबोधन करणे आणि त्याद्वारे समाजात इष्ट ती सुधारणा घडवून आणणे हे हरिभाऊंनी आपले ध्येय ठरविले असावे. याचा प्रत्यय त्यांच्या कादंबऱ्याद्वारे येतो. स्त्रियांची विशेषत: सासुरवाशिणींची दुःखे त्यांनी वेशीवर टांगली आहेत. स्त्री स्वातंत्र्य आणि स्त्री सुधार हे त्याचे अत्यंत जिव्हाळ्याचे विषय दिसतात.

'पण लक्षात कोण घेतो!' मधून हरिभाऊ आपटे

330



Scanned by TapScanner

त्यांना घरामध्ये सामावून घेतलेले दिसते. एकंदरीतच एकत्र कुटुंबातून स्त्रियांच्या व्यक्तित्वाचा संकोच झालेला दिसतो. कर्मठ प्रवृत्तीचे पुरूष तसेच तरूण पिढीच्या स्त्रिया सुद्धा सुधारणेच्या विरूद्ध दिसतात. कर्मठ विचारसरणीतून आपली जात श्रेष्ठ राहावी, शुद्ध रहावी यासाठी स्त्रियांवर कडक बंधने लादल्या गेलेली दिसतात. त्याचे अनुकरण इतर जातींनी केले. स्त्री ही भूमी आहे, तिच्यात आपण जे बीज पेरू तेच उगवेल. म्हणून जात शुद्ध राहण्यासाठी स्त्री ही पवित्र, निष्कलंक राहिली पाहिजे. यामुळे हिंदू धर्मामध्ये विविध जाती आपल्या मुलींची बालपणीच लग्ने लावू लागली.३ त्याचा परिणाम म्हणून स्त्रीशिक्षणाला फाटा मिळाला. पुनर्विवाहाला होणारा निषेध याच कल्पनेतून होत असावा. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत केशवपनाचे प्राबल्य दिसते. बाबा पदमनजींच्या 'यमुना पर्यटन' वरूनही तत्कालीन स्त्रियांच्या परिस्थितीची कल्पना येते. ताराबाई शिंदे यांच्या १८८२ मध्ये प्रकाशित झालेल्या 'स्त्रीपुरूष तुलना' या निबंधाद्वारे सुद्धा तत्कालीन स्त्रियांच्या जीवनाची वास्तव स्थिती समोर येते.

**समारोप :**

एकत्र कुटुंबातील स्त्री ही परवश, अज्ञान व अंधश्रद्धेमुळे आत्मसन्मान, स्वत्व गमावून बसलेली दिसते. एकत्र कुटुंबातील मर्यादेच्या कल्पनेमुळे गावाला जाणाऱ्या नवऱ्याला देण्यासाठी केलेला 'गोविंदविडा' यमूच्या ओच्यात तसाच राहून जातो. एकत्र कुटुंबातील दयनीय परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी स्त्रिया प्रयत्न करताना दिसत नाहीत. यमू आणि मथू मात्र स्त्री शिक्षणाचे महत्व जाणतात व आपल्या परीने परिस्थितीवर मात करण्याचा प्रयत्न करतात. यावरून असे म्हणता येईल की, एकोणिसाव्या शतकाच्या अखेरी अखेरीला स्त्री ही जागृत होऊ लागलेली दिसते. आज एकविसाव्या शतकाच्या प्रारंभकाळी दिसत आलेल्या आधुनिक स्त्रीची हा प्रारंभबिंदूच मानावा लागेल.

**संदर्भ टिपा :**

१. भा. वि. वरेरकर, विधवाकुमारी, पुणे, आवृत्ती तिसरी १९९३ पृ. क्र. १०

२. प्रा. बा. ल. कुलकर्णी, प्रदक्षिणा खंड १, पुणे, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुनर्मुद्रण २००२, पृ. क्र. २१५ वरून उद्धृत

३. ताराबाई शिंदे, स्त्रीपुरूष तुलना, पुणे, मा. जोतिबा फुले यांच्या १०० व्या पुण्यतिथी निमित्त झालेले प्रकाशन, प्रस्तावना पृ. क्र. ३-४.

□□□

330

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana



Scanned by TapScanner